पनवेल (प्रतिनिधी) पडघे गावाला पाणी टंचाई भासू नये, यासाठी बामर लॉरी कंपनीने निधी देवून सामाजिक कार्याला हातभार लावला असून हे चांगले काम करून बामर लॉरी कपंनीने तसेच पडघे ग्रामपंचायत व पनवेल रोटरी टाऊनशीप यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे आज (शनिवारी) केले.

पडघे ग्रामपंचायत, बामर लॉरी ॲन्ड कंपनी व रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने पडघे येथे पिण्याच्या पाण्यासाठी टाकी उभारण्यात येणार आहेत. त्या कामाचे भूमीपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, पडघे ग्रामपंचायतीने सातत्यपूर्ण पाठपुरावा करून बामर लॉरीच्या मदतीने गावाच्या हितासाठी या निमित्ताने एक चांगला उपक्रम अंमलात आणला आहे. यामुळे येथील नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक मिळणार आहे. उद्योग धंदा करत असताना स्थानिक गावाचा विकास साधण्याच्या कंपनीच्या सकारात्मक दृष्टीकोनामुळे विकासाला अधिक चालना मिळेल असा विश्वास व्यक्त करून आ.ठाकूर यांनी बामर लॉरी कंपनीचे अभिनंदन केले तसेच भविष्य काळातही कंपनीकडून अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविले जातील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमास बामर लॉरी कंपनीचे अधिकारी विश्वजीत नंदी, ज्येष्ठ नेते व पंचायत समिती सदस्य अरूणशेठ भगत, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनचे अध्यक्ष संपत ससाणे, रो.रतनचंद करवा, रो.अरविंद सावळेकर, आर.एस.पटेल, श्री.रायमाने, ज्येष्ठ पत्रकार प्रमोद वालेकर, सैफुद्दीन व्होरा, प्रकाश शृंगारपुरे, माजी सरपंच कृष्णाशेठ पाटील, बाबूशेठ भोईर, बीमा कॉम्प्लेक्स कळंबोलीचे अध्यक्ष रामदास शेवाळे, माजी पंचायत समिती सदस्या कुंदा पाटील, सरपंच अशोक भोईर, उपसरपंच राजाराम भोईर, पांडुशेठ भोईर, ग्रामपंचायत सदस्य दिलीप भोईर, नकुल जोशी, मंगला कांबळे, नर्मदा जोशी, गजानन पाटील, वंदना भोईर, गुरूनाथ जोशी, ग्रामसेवक नागनाथ घाडगे, सुनिल भोईर, सचिन चौधरी, अशोक साळुंखे, संदीप तांडेल यांच्यासह युवक मोठया संख्येने उपस्थित होते.

१५ हजार लोकसंख्या असलेल्या पडघे गावाला बामर लॉरी ॲन्ड कंपनीच्यावतीने ६८ लाख रूपयांचे आर्थिक सहकार्य पाणी टाकी बांधण्यासाठी मिळणार असून यातून अडिच लाख लिटर पाणी साठवणूक क्षमतेच्या दोन टाक्या बांधण्यात येणार आहे, अशी माहिती सरपंच अशोक भोईर यांनी यावेळी बोलताना देवून यामुळे येथील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा होईल आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल, असेही सांगितले.